स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ ,नांदेड .

मानव्यविद्याशाखे अंतर्गत 'इतिहास' विषयाच्या

पीएच्.डी.पद्वीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा संशोधन आराखडा

संशोधन विषय

ब्रिटीश राजवटीचे महाराष्ट्राच्या विकासातील योगदान -एक ऐतिहासिक अवलोकन (इ.स.१८१८ ते इ.स.१९४७)

संशोधक

रामप्रसाद मोहनराव व्हडगीर

एम.ए.,बी.एड,सेट,नेट (इतिहास)

मार्गदर्शक

प्रा.डॉ.शिवराज चंद्रकांत बोकडे

सहयोगी प्राध्यापक तथा संशोधक मार्गदर्शक

पदवी व पदव्युत्तर इतिहास विभाग,

यशवंत महाविद्यालय, नांदेड

नोव्हेंबर - २०१९

ब्रिटिश राजवटीचे महाराष्ट्राच्या विकासातील योगदान - एक ऐतिहासिक अवलोकन (इ.स. १८१८ ते १९४७)

प्रस्तावना

भारताच्या इतिहासात महाराष्ट्राचे स्थान अनन्य साधारण आहे.महाराष्ट्राला खूप मोठा प्राचीन वारसा लाभलेला आहे. प्राचीन आणि मध्ययुगीन काळात अनेक राजकीय सत्ता महाराष्ट्रात अस्तित्वात होत्या.प्राचीन काळात महाराष्ट्रात मौर्य सत्तेचा प्रसार झाल्याचे दिसून येते. मौर्य सम्राट अशोकाचे महाराष्ट्रात दोन शिलालेख सापडले आहेत त्यापैकी एक ठाणे जिल्ह्यात सोपारा आणि दुसरा चंद्रपूर जिल्ह्यात देवटेक येथे सापडला आहे. त्यानंतर महाराष्ट्रात आलेल्या सातवाहन घराण्याने महाराष्ट्राचे व दक्षिण भारताचे स्थान आंतरराष्ट्रीय स्तरावर घेऊन जाण्याचे काम केले. इ.स.पूर्व २३० ते इ.स.२३० अशी जवळपास ४६० वर्षे राज्य करणारे संपूर्ण भारतातील सातवाहन हे एकमेव घराणे होय.सातवाहना नंतर वाकाटकाच्या काळात महाराष्ट्राची साहित्य, कला आणि धर्म या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती झाली होती. वाकाटकानंतर कलचुरी घराण्याने महाराष्ट्राच्या काही भागावर राज्य केले. सहाव्या शतकात बदामीच्या चालुक्याच्या हातात महाराष्ट्राची सत्ता आली. चालुक्याच्या काळात साहित्य व स्थापत्य क्षेत्रात महाराष्ट्राचा विकास झाला.राष्ट्रकुटाच्या काळात तर अनेक क्षेत्रात दैदिप्यमान कामगिरी झाली. कृष्ण पहिला यांनी वेरुळ येथे जग प्रसिध्द कैलास मंदिराची निर्मिती केली. त्यानंतर देवगिरीच्या यादवांनी अनेक क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी केली. स्थापत्य क्षेत्रात आणि मराठी भाषेसंबंधी त्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले. इ.स.१३१८ मध्ये देवगिरीच्या यादवाची सत्ता संपुष्टात आली. यादवाचा पराभव करुन अल्लाउद्दीन खिलजीने महाराष्ट्रावर वर्चस्व प्रस्थापित केले. त्यानंतर तुघलकाच्या काळात दक्षिणेत बहमनी राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्राचा काही भाग

त्यांच्या वर्चस्वाखाली होता. बहमनीचे विभाजन झाल्यानंतर पाच शाह्या अस्तित्वात आल्या.या पैकी वऱ्हाडची इमादशाही, अहमदनगरची निजामशाही आणि बिदरची बरीदशाहीच्या ताब्यात नांदेड, उस्मानाबाद, लातूर होते तर विजापूरच्या अदिलशाहीच्या ताब्यात रत्नागिरी, सातारा आणि पुणे हे जिल्हे होते.

इ.स.१६४७ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी आदिलशाहीच्या ताब्यातून तोरणागड किल्ला जिंकला आणि सतराव्या शतकाच्या मध्यास मराठा साम्राज्याची मुहूर्तमेढ रोवली. छत्रपती शिवाजी महाराजांनी इ.स.१६४७ मध्ये राज्यभिषेक केला. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्यात आदर्श प्रशासन व्यवस्था निर्माण केली होती.

इंग्लंडमध्ये सन १६०० मध्ये ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना होऊन ही कंपनी व्यापाराच्या निमित्ताने भारतात आली. ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीने भारतात बस्तान बसविल्या नंतर इ.स.१८१८ मध्ये ब्रिटीशांनी पेशव्यांचा पराभव करुन मराठ्यांचे राज्य काबीज केले सध्याच्या महाराष्ट्राचा विदर्भ आणि मराठवाडा सोडून इतर भाग ब्रिटीशाच्या बॉम्बे प्रेसिडेन्सिचा भाग होता तर विदर्भ मध्य प्रांताचा भाग होता. इ.स.१८१८ मध्ये ब्रिटिश सत्ता महाराष्ट्रात स्थापन झाल्यानंतर अनेक नविन मूल्यांची सुरुवात महाराष्ट्रात झाली. परकीय राजवट म्हणून ब्रिटिश राजवटीस बहुतांश वेळा दुशने दिली जातात. परंतु त्या राजवटीत भारतीय हिताच्या काही गोष्टी घडल्या त्या भारतीयासाठी वरदानच मानाव्या लागतील. ब्रिटिश राजवटीत सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि प्रशासनात अनेक दृष्टीनी विकास झाला.ब्रिटीश राजवट ही अनेक क्षेत्रात वरदान ठरली.म्हणूनच ब्रिटीश राजवटीचे महाराष्ट्राच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे दिसून येते.

विषयाची निवड

पेशवाईचा शेवट करुन इ.स.१८१८ मध्ये ब्रिटीश सत्ता महाराष्ट्रात प्रस्थापित झाली.ब्रिटीश सत्तेसोबत नवीन आधुनिक मूल्यांची सुरुवात महाराष्ट्रात झाली. आधुनिक

शिक्षण, प्रशासन, रेल्वे टपाल,तार, नविन उद्योग, वृत्तपत्राचा विकास ब्रिटीश राजवटीमुळे झाला. सामाजिक समता निर्माण करण्यास ब्रिटीश शासन व्यवस्था वरदान ठरली.ब्रिटीश हे परकीय होते त्यांनी भारतीय जनतेचे शोषण केले हे जरी खरे असले तरी ब्रिटीशामुळे नवशिक्षण, आधुनिकता, लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मानवी मूल्यांचा विकासही झाला. ब्रिटीश राजवटीचे एकांगी दृष्टीने मूल्यमापन करणे योग्य नाही या दृष्टीकोनातून सकारात्मक दृष्टीने महाराष्ट्राच्या विकासात ब्रिटीश राजवटीचे खूप मोठे योगदान आहे. तसेच ब्रिटीश राजवटीची दुसरी बाजू समोर यावी ती अधिक चिकित्सक व ऐतिहासिक दृष्टीणे मांडण्यासाठी ब्रिटीश राजवटीचे महाराष्ट्राच्या विकासातील योगदान - एक ऐतिहासिक अवलोकन (इ.स.-१८१८ ते इ.स. १९४७) या विषयाची निवड केली आहे.

संशोधनाची उदिष्ट्चे

१) ब्रिटीश राजवटीचा भारताच्या विकासाबरोबरच महाराष्ट्राच्या विकासातील योगदानाचा अभ्यास करणे.

२) ब्रिटीश राजवटीमुळे महाराष्ट्रात झालेल्या सामाजिक परिवर्तनाचा आढावा घेणे.

३) ब्रिटीशांनी महाराष्ट्रातील आर्थिक विकासाच्या योगदानात केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

४) ब्रिटीश राजवटीने महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासात केलेल्या सुधारणांचा आढावा घेणे.

५) ब्रिटीशांनी महाराष्ट्रात निर्माण केलेल्या प्रशासकीय व्यवस्थेचा व सुधारणेचा अभ्यास करणे.

गृहीतकृत्ये

१) ब्रिटीश राजवटीचे महाराष्ट्राच्या विकासात महत्त्वाचे योगदान आहे.

२) ब्रिटीश राजवटीमुळे महाराष्ट्रात सामाजिक विकास व परिवर्तन टप्याटप्याने झालेले दिसून येते.

३) ब्रिटीश राजवटीमुळे महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचा स्तर उंचावत गेला होता.

४) ब्रिटीश राजवटीमुळे महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासात महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत.

५) ब्रिटीशांची प्रशासकीय कारभाराची देन महाराष्ट्राला प्राप्त झाली.

तथ्य संकलन

सामाजिकशास्त्रामध्ये तथ्य संकलनाचे दोन भाग पडतात. प्राथमिक स्रोत व दुय्यम स्रोत हे होत. ब्रिटीश राजवटीचे महाराष्ट्राच्या विकासातील योगदान -एक ऐतिहासिक अवलोकन (इ.स.-१८१८ ते इ.स. १९४७) या विषयाच्या संशोधनासाठी अनेक प्राथमिक व दुय्यम संदर्भ स्त्रोताचा उपयोग केला जाणार आहे. तथ्य संकलनाच्या प्राथमिक स्त्रोतात गव्हर्नराचे पत्रव्यवहार,आदेश, नोंदी, विविध कायदे; अहवाल, इत्यांदीचा वापर करण्यात येईल तर दुय्यम स्रोतामध्ये संदर्भ ग्रंथासोबतच विविध मासिके, वृत्तपत्र इत्यादी वापर करण्यात येईल.

संशोधन पध्दती

ब्रिटीश राजवटीचे महाराष्ट्राच्या विकासातील योगदान एक ऐतिहासिक अवलोकन (इ.स.-१८१८ ते इ.स. १९४७) या विषयावर संशोधन कार्याकरीता ऐतिहासिक संशोधन पध्दती, संदर्भ संशोधन पध्दतीचा प्रामुख्याने वापर केला जाणार आहे.

संशोधनाचा कालावधी

प्रस्तुत संशोधन हे ब्रिटीश राजवटीचे महाराष्ट्राच्या विकासातील योगदानाशी संबंधीत असल्याने ब्रिटीश राजवटीच्या महाराष्ट्रातील आगमनापासून म्हणजेच इ.स.१८१८ पासून ते ब्रिटीश राजवटीच्या अस्तापर्यत म्हणजेच इ.स.१९४७ पर्यंतचा आढावा घेण्यात येईल. या कालखंडातील ब्रिटीशाची नीती, धोरणे व योजना आणि त्यातून झालेला

महाराष्ट्राचा विकास पुढे त्यातून घडलेला नवसमाज यांचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात केला जाणार आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

प्रस्तुत संशोधन हे ब्रिटीश राजवटीचे महाराष्ट्राच्या विकासातील योगदानाशी संबंधीत आहे.ब्रिटीश राजवटीमुळे महाराष्ट्रात सामाजिक,आर्थिक, शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्रात झालेला विकास या बाबींचा आढावा घेण्यात येईल. ब्रिटीश राजवटीच्या प्रतिकूल परिणामाचा अभ्यास केला जाणार नाही.ब्रिटीश राजवटीमुळे सामाजिक,शैक्षणिक,आर्थिक व प्रशासकीय मूल्यात जो बदल झाला व त्यामुळे महाराष्ट्रीय लोकांचा जो विकास झाला त्यावर भर देण्यात येईल.

संशोधन विषयाचे महत्त्व

ब्रिटीश राजवटीचे भारतात दीर्घकाळ अस्तित्व होते.ब्रिटीश राजवटीच्या पाऊलखुणा आजही संपूर्ण भारतात दिसतात. ब्रिटीश शासन व्यवस्थेचे महाराष्ट्रात आगमन झाल्यानंतर नव्या आधुनिक मूल्यांची सुरुवात झाली. ब्रिटीश राजवटीने केवळ महाराष्ट्रीयन जनेतचे केवळ शोषणच केले असे म्हणने योग्य ठरणार नाही तर त्यांनी अनेक क्षेत्रात विकास कामाची मुहूर्तमेढ रोवली. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, संवैधानिक, प्रशासन यात महत्त्वाूर्ण बदल घडवून आणले त्यामुळे महाराष्ट्राच्या विकासात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्या दृष्टीनेच ब्रिटीश राजवटीचे महाराष्ट्राच्या विकासातील योगदान एक ऐतिहासिक अवलोकन हा विषय घेऊन अधिक चिकित्सक व ऐतिहासिक अवलोकन करुन सकारात्मक बाजूही अभ्यासकासमोर यावी या हेतूनचे प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

<u>प्रकरण निहाय रचना</u>

प्रकरण पहिले - ब्रिटीश राजवटीची पार्श्वभूमी व महाराष्ट्राची ओळख

प्रस्तुत प्रकरणात ब्रिटीश राजवटीची पार्श्वभूमी, महाराष्ट्राची ओळख, भौगोलिक माहिती व महाराष्ट्रातील ऐतिहासिक राजवटीचा आढावा घेण्यात येणार आहे

प्रकरण दुसरे - ब्रिटीश राजवट व महाराष्ट्राचा सामाजिक विकास

प्रस्तुत प्रकरणात ब्रिटीश राजवटीमुळे सामाजिक जीवनात जे बदल झाले व सामाजिक जीवनात जी नविन मूल्याची पेरणी झाली त्यांचा आढावा घेण्यात येईल. महाराष्ट्रीय जनतेच्या जीवनात ब्रिटीश राजवटीमुळे जो सामाजिक विकास व परिवर्तन झाले, यासाठी ब्रिटीशांनी जी कायदे केले, त्या बाबीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे - ब्रिटीश राजवट व महाराष्ट्राचा आर्थिक विकास

प्रस्तुत प्रकरणात ब्रिटीश राजवटीमुळे महाराष्ट्रात झालेला आर्थिक विकास,उद्योगाची वाढ व दळण-वळण व्यवस्थेचा विकास, शेतीचे व्यापारीकरण, नविन महसूल पद्धती सहकार चळवळ इत्यादी बाबींचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्यात येणार आहे.

_प्रकरण चौथे - ब्रिटीश राजवट व महाराष्ट्राचा शैक्षणिक विकास

प्रस्तुत प्रकरणात ब्रिटीश राजवटीच्या आगमनानंतर महाराष्ट्रीयन लोकांमध्ये ज्या शैक्षणिक जाणीवा निर्माण झाल्या तसेच नविन आधुनिक मूल्य असलेल्या पाश्चात्य शिक्षणाची सुरुवात झाली.ब्रिटीश राजवटीमुळे जी शैक्षणिक कायदे झाले, त्यामधून जो शैक्षणिक विकास झाला, त्या संदर्भातील शैक्षणिक विकासाचा मागोवा या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे - ब्रिटीश राजवट व महाराष्ट्राचा प्रशासकीय विकास

प्रस्तुत प्रकरणात ब्रिटीश राजवट महाराष्ट्रात स्थापन झाल्यानंतर महाराष्ट्राची प्रशासकीय सरंचना, कायदयाचे राज्य, संवैधानिक विकास, विविध कायदे, न्यायसंस्था, जबाबदार शासन पध्दतींचा अनुभव, जनतेला मिळालेली सुरक्षिततेची हमी इत्यादी बाबीचा आढावा या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे -निष्कर्ष

' प्रबंधातील सहावे आणि शेवटचे प्रकरण निष्कर्षाचे असून या प्रकणात वरील प्रकरणाच्या अभ्यासातून तथ्य विश्लेषनाच्या आधारे उद्देश व गृहितकृत्याला अनुसरुन निष्कर्ष मांडले जातील.तसेच सुरुवातीला मांडण्यात आलेल्या गृहितकृत्याचे परिक्षण करण्यात येईल. ब्रिटीश राजवटीची महाराष्ट्राला काय देन आहे या संदर्भात शोध अभ्यासाअंती जे निष्कर्ष हाती येतील ते मांडले जातील.

संशोधन आराखड्यात सखोलतेने नोंदविलेल्या बाबीमध्ये बदल संभवू शकतो

संदर्भग्रंथ सूची :-

१)	आपटे प्रभा व इतर संपादन समिती	-	महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसा, भारतीय इतिहास संकलन समिती, मुंबई - प्रथमावृत्ती २००९
२)	किर धनजंय, मालशे स.ग,	-	कंपनी सरकार, राजहंस प्रकाशन, पुणे, (१९७९)
३)	केतकर श्री.व्य.	-	प्राचीन महाराष्ट्र - विभाग-पहिला, प्रथम वर्ष १९३५
४)	खरे ग.द.	-	मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहास, भाग -१, (१२२६-१६३६) संपा.गो.त्र्यं कुलकर्णी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्रथमावृत्ती, २००९
५)	ग्रोवर बी.एल., बेल्हेकर एन.के	-	आधुनिक भारताचा इतिहास - एक नविन मूल्यांकन एस.चंद आणि कंपनी, दिल्ली, २००१

६)	घोडके ह.म.	-	महाराष्ट्रगाथा खंड -१ राजहंस प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, २०००
७)	जोशी प.म.	-	भारतीय संस्कृती कोश -खंड ०३ पणजी, १९६५
८)	पंडित भवानिशंकर	-	महाराष्ट्राच्या जीवनातील स्थित्यंतरे आणि त्यांचा साहित्यावर व संस्कृतीवर झालेला परिणाम, विद्यापीठ प्रकाशन, पुणे १९६९.
९)	मोडक बा.प्र.	-	मुंबई इलाख्याचे ग्याझिटीअर -२४, कोल्हापूर, १८९०
१०)	वाळीबे रा.शं	-	महाराष्ट्राची सामाजिक पूर्नघटना, भाग-१ पुणे(१९६२)
11)	Khandepkar Neeta M	-	The Christian missionaries in costal Maharashtra Christian Word Imprints, Delhi,1 Jun. 2015
12)	Sunthankar B.R	-	Nineteenth Century History of Maharashtra, Vol-1 1818-1857
13)	Sunthankar B.R	-	Maharashtra, 1858-1920, Papular Book Depot, Bombay (1993)

संशोधक

रामप्रसाद मोहनराव व्हडगीर

मार्गदर्शक

प्रा.डॉ.शिवराज चंद्रकांत बोकडे

सहयोगी प्राध्यापक तथा संशोधक मार्गदर्शक

यशवंत महाविद्यालय, नांदेड.